# महावितरण

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

# जाहिर निवेदन

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित रास्तापेठ शहर मंडल पुणे अंतर्गत शिकाऊ उमेदवार अधिनियम –१९६१ अन्वये सन २०२१–२०२२ करिता वीजतंत्री / तारतंत्री या व्यवसायाची शिकाऊ भरती प्रक्रिया राबविण्यात येत आहे. सदर शिकाऊ उमेदवार भरतीकरिता दोन वर्षाचा आय.टी.आय (वीजतंत्री /तारतंत्री) उत्तीर्ण असणाऱ्या उमेदवारांनी शासनाच्या www.apprenticeshipindia.org या संकेतस्थळावर रास्तापेठ शहर मंडल पुणे अंतर्गत असणाऱ्या १) रास्तापेठ विभाग – E04172702347, २) नगररोड विभाग – E01172700899, ३) बंडगार्डन विभाग – E01172700580, ४) पदमावती विभाग – E 01172700506 व ५) पर्वती विभाग– 5 01172700045 या आस्थापना वर ऑनलाईन (Online) अर्ज दि.२१/०८/२०२१ पासुन ते दि.२६/०८/२०२१ पर्यंत रात्री १२.०० वाजेपर्यंत सादर करावेत.

शिकाऊ उमेदवारी हि एक वर्षाची असुन वीजतंत्री ९४ व तारतंत्री ५५ अशा एकुण १४९ जागा भरावयाच्या आहेत. १) शैक्षणिक अर्हता : शिकाऊ वीजतंत्री (इलेक्ट्रिशियन) व शिकाऊ तारतंत्री (वायरमन) यांच्यासाठी दोन वर्ष कालावधीचा अनुक्रमे आय.टी.आय, वीजतंत्री (इलेक्ट्रिशियन) किंवा तारतंत्री (वायरमन)अभ्यासक्रम (कोर्स) उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. २) वयोमर्यादा सर्वसाधारण उमेदवारांसाठी ३० वर्षे,मागासवर्गीय उमेदवारांसाठी ३५ वर्षे राहील ३) प्रशिक्षण कालावधी ०१ वर्ष असेल. ४) विद्यावेतन नियमाप्रमाणे मिळेल ५)पद कमी जास्त करण्याचा व भरती प्रक्रियेशी निगडीत असलेले सर्व अधिकार व्यवस्थापन राखून ठेवीत आहे. ६) ऑनलाईन अर्ज करताना एस.एस.सी.उत्तिर्ण गुणपत्रिका व सनद यामध्ये नमूद केलेले नांव व जन्मतारीख हे आधार कार्डवर नमूद असलेल्या नावाशी व जन्म तारखेशी सुसंगत असावे,तसेच सद्यस्थितीत कार्यान्वित असलेला ई–मेल आयडी व भ्रमणध्वनी क्रमांक ऑनलाईन अचूक नमूद करावा. ७) आय.टी.आय,उत्तिर्ण प्रमाणपत्र (चार सेमिस्टर गुणपत्रिका) साक्षांकित प्रत आवश्यक. ८) उमेदवाराने मागास प्रवर्गात अर्ज केला असल्यास जात प्रमाणपत्राची छायांकित प्रत. ९) भरती प्रक्रिये दरम्यान राजकीय दबाव आणल्यास आपली उमेदवारी रद्द समजण्यात येईल याची नोंद घ्यावी.

उमेदवारांनी Online अर्ज सादर करताना शैक्षणिक मुळ प्रमाणपत्र स्कॅन करून अपलोड करणे बंधनकारक असुन त्यांची एक प्रत अधीक्षक अभियंता, म.रा.वि.वि.कंपनी मर्यादित, रास्तापेठ शहर मंडल कार्यालय,पुणे ब्लॉक नं.२०४, पहिला मजला मानव संसाधन विभाग येथे **दि.२७/०८/२०२१** रोजी संध्याकाळी ५.३० पर्यंत सादर करावी. वरिल कालावधीत online व offline अर्जाची प्रत सादर न केल्यास अशा अर्जाचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी. तसेच उमेदवारांनी अर्ज व मुळ कागदपत्रे पडताळणीसाठी **दि.३१/०८/२०२१ ते ०२/०९/२०२१** पर्यंत सकाळी १०.३० वाजता अधीक्षक अभियंता, म.रा.वि.वि.कंपनी मर्यादित, यांचे कार्यालय रास्तापेठ शहर मंडल प्रशासकीय इमारत ब्लॉक नं.२०४, पहिला मजला रास्तापेठ, पुणे –४११०११. येथे हजर रहावे.

पी.आर.ओ. क्र.८१/२१ **अधीक्षक अभियंता,रास्तापेठ शहर मंडल, पुणे**